* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

दि.१२/०१/२०१९

---

## वाशिम शहरातील कुख्यात गुंड गल्ला यास शस्त्रासह अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

मा. मोक्षदा पाटील, पोलीस अधीक्षक वाशिम यांना दि.११.०१.२०१९ रोजी गुप्त बातमीदारांमार्फत खात्रीलायक बातमी मिळाली की, सतिष उर्फ गल्ला विठठल वानखेडे, रा. लाखाळा वाशिम हा त्याचे राहते घराजवळील कोठयात विनापरवाना घातक शस्त्राचा साठा साठवुन ठेवलेला असुन तो स्वत: त्याचे जवळ नेहमी विनापरवाना घातक शस्त्र बाळगतो. आता त्याला पकडुन त्याची अंगझडती घेतल्यास त्याचे जवळ धारदार घातक शस्त्र मिळुन येईल अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून मा.मोक्षदा पाटील पोलीस अधिक्षक वाशिम यांनी पो.नि.ठाकरे,स्थागुशा वाशिम यांना माहिती देवुन लाखाळा येथे राहणारा सतिष उर्फ गल्ला विठठल वानखेडे, यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेश दिले त्यावरुन पोलीस निरीक्षक ठाकरे,सपोनि अतुल मोहनकर,पोउपनि पायघन, तसेच स्थागुशा येथील कर्मचारी दिलेल्या माहीती प्रमाणे लाखाळा येथे जावुन सतिष उर्फ गल्ला विठठल वानखेडे याचा शोध घेतला असता तो विर पान सेंटर लाखाळा येथे उभा असलेला तेव्हा त्याला ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या अंगझडती मध्ये एक काळया रंगाची लोखंडी गुप्ती मिळुन आल्याने त्यास त्याच्या राहत्या घरी घेवुन जावुन त्याच्या घराची घरझडती घेतली असता त्याच्या घराच्या जवळील कोठयामध्ये एक काळया रंगाची लोखंडी गुप्ती, एक काळया रंगाचे स्टीलचे खंजर, दोन लोखंडी कोयते असे घातक शस्त्र मिळुन आल्याने ते जप्त करून सतिष उर्फ गल्ला विठठल वानखेडे रा. लाखाळा वाशिम याचे विरूध्द सपोनि अतुल मोहनकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय हत्यार कायदा १९५९ कलम ४, २५ अन्वये गुन्हा नोंदवुन त्यास पुढील तपासकामी पोलीस स्टेशन वाशिम शहर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. मोक्षदा पाटील, पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.शिवा ठाकरे, सपोनि अतुल मोहनकर, पोउपनि भगवान पायघन, नापोकॉ/किशोर चिंचोळकर, सुनिल पवार, प्रेम राठोड, प्रशांत राजगुरू, पोकॉ निलेश इंगळे, अश्विन जाधव, अमोल इंगोले, संतोष शेणकुडे, राम नागुलकर, किशोर खंडारे, महिला कर्मचारी सारिका दांडगे, तहेमिना शेख, रेश्मा ठाकरे, संगिता शिंदे चालक आत्माराम राठोड यांनी केली आहे. मा. मोक्षदा पाटील पोलीस अधीक्षक वाशिम यांनी नागरीकांना अशाप्रकारच्या घटनेबाबत माहिती असल्यास न घाबरता अशा गुंडप्रवृत्ती विरुध्द ठामपणे मा. पोलीस अधिक्षक वाशिम, पोलीस निरिक्षक स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस स्टेशन वाशिम शहर यांचेकडे तक्रार करण्याची आवाहन केले आहे.

Sthakare 12/1/19

पोलीस निरीक्षक,

स्थानिक गुन्हे शाखा वाशिम